पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शिक्षण समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १३
सभावृत्तांत

**दिनांक – २०/०२/२०२०** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **२०/०२/२०२०** रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.कदम शशिकांत गणपत
५. मा.वैशाली जालिंदर काळभोर
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.अरुण जागडे – प्र.नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना भूगोल विषयाच्या आभ्यासासाठी सन २०२०-२१ साठी विविध प्रकारचे प्रति २ नकाशे मे.चैताली प्रकाशन मार्फत थेट पध्दतीने खरेदी करणेबाबत – मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी महापालिका शिक्षण समितीच्या शाळातील मुलां-मुलींना दुर्ग अबॅक्स अकॅडमी मार्फत प्रायोजिक तत्वावर तीन महिन्यांकरिता अबॅकसचे क्लास घेणेस परवानगी देणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या इ.बालवाडीच्या सर्व वर्गासाठी मोठे लोखंडी कपाट (Standard Size) व स्टोरेज युनिट (Rack) खरेदी करण्याबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव प्राथमिक शाळेत उपशिक्षक व १ पदवीधर शिक्षक मिळणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव प्राथमिक शाळेचा हॉल ताब्यात घेणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत बसविण्यात आलेले सी.सी. कॅमेरे व थम्ब मशीन अद्यावत करणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव शाळेच्या मैदानावरील पाय-यांवर पत्राशेड उभारणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी मे.ग्लोबल एज्युकेशन अन्ड टेक्नॉलॉजी सोल्युशन यांच्याकडून थेट पध्दतीने वाचन साहित्य रुणपरमाणु यंत्र (Digital Reading Assistant Kit) व त्यासाठी लागणारी पुस्तके खरेदी करणेबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांना ”आंम्ही घडलो वाचनाने” पुस्तक मे.अंशुल प्रकाशन मार्फत थेट पध्दतीने खरेदी करण्याबाबत - मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

दिनांक २०/०२/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता मा.महापालिका सभा असल्याने मा.शिक्षण समितीची दिनांक २०/०२/२०२० ची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २७/०२/२०१० रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

**मा.सभापती -** गुरुवार दिनांक २७/०२/२०१० रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक – १३

सभावृत्तांत

( दिनांक २०/०२/२०२० ची तहकुब सभा )

**दिनांक – २७/०२/२०२०** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची तहकूब सभा गुरुवार दिनांक **२७/०२/२०२०** रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.कदम शशिकांत गणपत
५. मा.वैशाली जालिंदर काळभोर
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

( शिक्षण समिती सदस्य मा.कदम शशिकांत गणपत व मा.सुलक्षणा राजू धर यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल शिक्षण समितीच्यावतीने मा.भाऊसाहेब भोईर यांनी त्यांचे अभिनंदन केले.)

**----------**

दिनांक ०६/०२/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४७ विषय क्रमांक -१

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून

येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थांच्या अभ्यासासाठी भूगोल विषयासाठी नकाशांची आवश्यकता असते. सदर नकाशे भूगोल विषयातील घटक समजावून घेण्यासाठी उपयुक्त असतात. तरी सदर नकाशे पुरविणेकामी मे.चैताली प्रकाशन मार्फत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. तरी मे.चैताली प्रकाशन मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थांना भूगोल विषयाच्या अभ्यासासाठी सन २०२०-२१ साठी विविध प्रकारचे नकाशे थेट पद्धतीने खरेदी करण्यात मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४८ विषय क्रमांक - २

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. सध्याच्या काळात मुलांची बौद्धिक वाढावी यासाठी नव्याने "अबॅकस" ही शिक्षण पद्धत सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने "दुर्ग अबॅकस अकॅडमी तर्फे शैक्षणिक मुलांची बौद्धिक क्षमता वाढविणे व त्यांचा विकास करण्याचे काम केले जात केले आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळातील मुलांची शैक्षणिक वाढ व्हावी यासाठी प्रायोगिक तत्वावर अबॅकस च्या आठ स्टेप पैकी "पहिली लेवल" साठी पिंपरी महापालिकेच्या दोन शाळांमध्ये(प्रत्येकी 50 बॅच) क्लास घेण्यासाठी त्यांच्या मार्फत प्रस्ताव झाला आहे. अबॅकसचे क्लास तीन महिने आठवड्यातून एका दिवसात दोन तास घेतले जातात. तीन महिन्यात अबॅकसची एक स्टेप पूर्ण होते. याकाळात प्रत्येक मुलांना पुस्तके व लागणारी इतर साहित्य दिले जाते. शेवटी परीक्षा घेऊन त्यांना "प्रमाणपत्र" दिले जाते. इयत्ता चौथी ते सातवी मध्ये शिकणारी व स्कॉलरशिप च्या परीक्षेत बसणा-या 50 मुलां मुलींची एक बॅच प्रमाणे दोन शाळामध्ये (चिंचवडगाव परिसरातील) एक एक बॅच अशा दोन बॅच शिकवण्यासाठी त्यांनी विनंती प्रस्ताव दिला आहे. अबॅकस च्या पहिल्या स्टेप च्या मुलांना पुस्तके देणे, तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये क्लासद्वारे त्यांची बौद्धिक क्षमता वाढविणे, परीक्षा घेणे व त्यांना प्रमाणपत्र देणे यासाठी प्रत्येक मुलास 3000 रु. खर्च येणार येत असून 100 मुलांच्या शिक्षणासाठी तीन लाख रुपये अपेक्षित खर्चास करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ४९ विषय क्रमांक - ३

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत एकूण २०७ बालवाडी चालविण्यात येतात. शिक्षण समिती सदस्यांच्या शाळेच्या पाहणी दौ-या दरम्यान बालवाडीच्या वर्गांची ही पाहणी करण्यात आली असता बालवाडीच्या वर्गात बालवाडी शिक्षकांना त्यांचे शालेय कामकाज साहित्य ठेण्यासाठी सोय नसल्याचे व बालवाडीतील विद्यार्थांना त्याची दफ्तरे,डबे वगैरे ठेण्यासाठी काही सोय नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या इ. बालवाडीच्या सर्व वर्गासाठी बालवाडी शिक्षकांसाठी त्यांचे शालेय कामकाज साहित्य ठेण्यासाठी प्रत्येकी १ मल्टीपल कपाचे मोठे लोखंडी कपाट (Standard size ) व बालवाडी विद्यार्थांसाठी प्रत्येकी ४ स्टोरेज युनिट ( Rack) खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५० विषय क्रमांक - ४

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव प्राथमिक शाळेत शिक्षक संख्या अपुरी असल्याबाबत थेरगाव शाळेतील मुख्याध्यापकांनी शिक्षण विभागास कळविले आहे.तरी शाळेतील शिक्षकांची माहिती घेता शाळेत उपशिक्षक व १ पदवीधर कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव प्राथमिक शाळेत उपशिक्षक व १ पदवीधर शिक्षकांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक - ५

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव प्राथमिक शाळेचा हॉल सध्या अगस्ती संस्थेकडे आहे व सध्या त्या हॉलमध्ये प्रयोगशाळा करण्यात आलेली आहे. तरी सदर शाळेचा हॉल पुन्हा आपल्याकडे ताब्यात घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक -६

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थांच्या सुरक्षितेसाठी सी.सी.कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तसेच शिक्षकांच्या हजेरी करण्याकरिता थंब मशीन बसविले आहे. सद्यस्थितीमध्ये प्राथमिक शाळेत बसविण्यात आलेले सी.सी.कॅमेरे व थंब मशीन हे काही शाळांमध्ये बंद अवस्थेमध्ये आहेत तरी प्राथमिक शाळांमध्ये बसविण्यात आलेले सी.सी.कॅमेरे व थंब मशीन अद्यावत करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५३ विषय क्रमांक -७

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव शाळेमध्ये पाहणी करताना असे निदर्शनास आले कि शाळेच्या मैदानावरील पाय-यांवर पत्राशेड नाही. त्याबाबत अनेकदा तक्रार करण्यात आलेली आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव शाळेच्या मैदानावरील पाय-यांवर पत्राशेड उभारण्याचे काम त्वरित करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५४ विषय क्रमांक -८

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार प्राथमिक शिक्षण विभागाअंतर्गत येणा-या सर्व बालवाडी व इ.१ ली इ. २ री च्या विद्यार्थांसाठी वाचनाची आवड निर्माण करण्याच्या हेतूने वाचन सहाय्यक ऋणपरमाणु यंत्र (Digital Reading Assistant Kit) व त्यासाठी लागणारी पुस्तके शाळांना उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मे. ग्लोबल एजुकेशन ॲन्ड टेक्नोलोजी सोल्युशन्स यांच्या कडून प्राप्त झालेला आहे. महानगरपालिकेतील शाळांमध्ये येणा-या विद्यार्थांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करायला लागतो. याचाच एक परिणाम म्हणून ते अभ्यासामध्ये मागे पडत. अनेक सरकारी शाळांमध्ये केलेल्या अभ्यासानुसार शाळेतील विद्यार्थांना मराठी व इंग्रजी मध्ये वाचन करताना अडथळे येतात. ही अडचण दूर करणेकामी शिक्षकांच्या प्रयत्नांबरोबर आपण तंत्रज्ञानाची मदत घेणे आवश्यक आहे. सदर संचामध्ये इंग्रजी, मराठी हिंदी या सर्व भाषा उपलब्ध होतील. त्याचबरोबर बाराखडी, गाणी,

गणित, गोष्टी, चित्र पुस्तके इत्यादी गोष्टी उपलब्ध असतील. वाचन सहाय्यक ऋणपरमाणु यंत्राच्या मदतीने मुले सदर पुस्तके वाचू व ऐकू शकतील. ह्या जोडीला संगीत व कवितांना चाली देखील उपलब्ध असतील. शब्दांचा आवाज व उच्चार कसा करावा याचे ज्ञान विद्यार्थांना मिळेल व त्यांचा शब्द संग्रह वाढणेस मदद होईल. सदर उपक्रम खर्च - प्रति संच २१,०००/- असून सदर उपक्रम प्रायोगिक स्वरुपात ५० बालवाड्यांमध्ये थेट पद्धतीने राबविणेसाठी मान्यता देणेत येत आहे. प्राथमिक शिक्षण विभागामध्ये उपलब्ध असलेल्या ई-लर्निंग या लेखाशिर्षकातून खर्च करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५५ विषय क्रमांक - ९

दिनांक - २७/०२/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.शशिकांत कदम

मा.निर्मला गायकवाड, मा.शशिकांत कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच विद्यार्थांबरोबर शिक्षकांचा ही अद्यावत वाचनाची माहिती मिळावी. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांना “ आम्ही घडलो वाचनाने” हे अंशुल प्रकाशनचे पुस्तक शिक्षकांना वाचनासाठी व विद्यार्थांना शिक्षणासाठी प्रेरणा देणारे आहे.तरी सदर पुस्तके पुरविणेकामी मे. अंशुल प्रकाशन मार्फत प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर पुस्तकास माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुभ संदेश असून हे पुस्तक राज्य शासनाच्या सर्व अनुदानित ग्रंथालयांमध्ये शासने उपलब्ध केलेले आहे. तरी मे.अंशुल प्रकाशन मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांना “ आम्ही घडलो वाचनाने” हे पुस्तक सन २०२०-२१ साठी थेट पद्धतीने खरेदी करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११२/२०२०
दिनांक : २८/०२/२०२०

(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.